# कोरोनानंतरची शेती

**डॉ. निशा अशोक कळंबे**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
इंदिरा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय,
कळमेश्वर, जि. नागपूर
९५२७७५५२५०
nishakalambe20@gmail.com

**सारांश :—**

कोरानाच्या आधी शेतीची अवस्था फार बरी नव्हती. शेतीमालाच्या किंमती पडल्या होत्या. टोमॅटोसारख्या भाजीपाल नासत होता. मात्र समस्या निर्माण झाल्या की मेहनत करून पिकवलेला शेतमाल रस्त्यावर फेकणे आणि नुकसानभरपाई मागणे हे कोरोनानंतरच्या जगात शक्य होणार नाही. दूरदृष्टीनेच शेती करावी लागेल. कोरडा व ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट, वादळ व विषाणूंच्या समस्या उद्‌भवणारच याची खूणगाठ मनाशी बांधून पर्यायी व्यवस्था तयार ठेवावी लागणार आहे. कोरोनाचा हल्ला ही शेतकऱ्यांना हुशार बनवणारी सुवर्णसंधी आहे.

**प्रस्तावना :—**

कोरोनाच्या भयानक व जीवघेण्या वादळाने सर्व क्षेत्रांप्रमाणेच कृषी क्षेत्रालाही जबरदस्त फटका दिला आहे. हे वादळ संपल्यानंतर जे शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेती करतील त्यांचे यानंतर फारसे भवितव्य राहणार नाही. कोरोनानंतरचे जग हे अत्यंत आव्हानात्मक असेल. त्यामुळे शेतीतील नवनवीन कल्पक आणि विषमुक्त तंत्रज्ञान शिकून घ्यावे लागेल. सेंद्रिय शेती करणाऱ्यांचे चांगले दिवस असतील.

कोरोनाचे संकट येण्याआधी शेतकरी जसे वागत होते तसेच ते या संकटानंतरही वागत राहिले तर त्यांच्या समस्या कायमच राहतील. या काळात खिशात पुरेसे पैसे नसतानाही प्रगती करायची झाल्यास त्यांना भावनिकता दूर ठेवून आणि कल्पकतेने कामे करावी लागणार आहेत. उद्याचे जग हे कोरोनासरख्या विषाणूंच्या हल्ल्याचे असू शकते. या जगात ज्यांची रोगप्रतिकार शक्ती बळकट तेच जगू शकतील. संकरित बियाणे, रासायनिक खते व जहाल विषारी कीटकनाशके वापरून उत्पादित अन्नधान्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढविणे अजिबात शक्य नाही. त्यामुळे उद्याची शेती ही प्राधान्याने सेंद्रीय आणि विषमुक्त शेती असेल, हे शेतकऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

**कोरोनानंतरच्या शेतीतील बदल :—**

कृषी क्षेत्रावर आलेल्या आर्थिक संकटापासून वाचवण्यासाठी खालील बदल तसेच उपाययोजनांची गरज आहे.

**बहूपिक पद्धती :—**

केवळ एकाच पिकाची लागवड आर्थिकदृष्ट्या यशस्वी ठरणार नाही. अनेक पिकांची लागवड हा शेतीचा विमा असेल. एखाद्या पिकाला किफायतशीर भाव मिळाला नाही तर इतर पिके मदतीला येतील. शिवाय शेतमालावर प्रक्रिया करून, पिकांचे मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांना भक्कम पैसा कमवावा लागेल.

**विषमुक्त शेतमालाला संधी :–**

जगभरात रोगप्रतिकार शक्ती वाढवणाऱ्या विषमुक्त शेतमालाला प्रचंड मागणी असेल. त्याचा पुरवठा करण्यासाठी मोठमोठ्या कंपन्या पुढे येतील. आजच अशा अनेक कंपन्यांनी किराणा, भाजीपाला, धान्य, दूध, दही, ताक माफक दरात घरोघरी पोहोचवण्यास सुरूवात केली आहे. सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीतील व्यापाऱ्यांना कवडी मोल दरात आपला शेतमाल विकण्याऐवजी अशा कंपन्यांना विकून रक्कम पैसा कमावता येईल.

**बियाणे कंपन्यांना पॅकेज :–**

लॉकडाऊनमुळे बी–बियाणे आणि खताच्या कंपन्यांनी ८० टक्के कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात केली आहे. बराच कामगार वर्ग आपआपल्या गावी निघून गेला आहे. खरिपाच्या तोंडावर कंपन्या बंद आहे. डिमांड – सप्लाय चेन तुटली आहे. भारताला मदत करणारे देशही अडचणीत आहेत. बंद कंपन्या सुरू करायच्या झाल्या तरी कामाला लोक कोठे आहेत. लोक टिकून ठेवण्यासाठी आणि गेलेल्यांना परत बोलावण्यासाठी कंपन्यांना सरकारने विश्वास द्यावा लागेल. त्यासाठी त्यांना अधिक पॅकेज देणे गरजेचे आहे.

**पिक पद्धतीवर नियंत्रण आणावे :–**

१९७६ पूर्वीची पारंपरिक पिक पद्धती राबवण्याची ही योग्य वेळ आहे. आपापल्या भागातील हवामान, पाण्याची उपलब्धता आणि मागणी लक्षात घेऊन पीक पद्धतीकडे वळावे. मराठवाड्यातील लोकांनी ऊस लागवड बंद करावी. या ऐवजी डाळीचे पिक घ्यावे. सनातन पीक पद्धतीचा अवलंब करावा. सरकारने यासाठी प्रोत्साहन द्यावे.

**शेतमालाला विशेष दर्जा द्यावा :–**

कोरोनामुळे पहिल्यांदाच लोकांना शेतमालाचे महत्व पटले आहे. दररोजच्या जेवणात भाज्या नसल्यावर काय होते, हे समजले आहे. याचा फायदा घेत सरकारने शेतीमालाला विशेष मालाचा दर्जा द्यावा.

**प्रत्येकाच्या हातात पैसा :–**

मागील थकबाकीचा विचार न करता प्रत्येक शेतकऱ्याला पतपुरवठा उपलब्ध करून द्यावा. यासाठी आपातकालीन निधी, साथरोग नियंत्रण निधी अशांचा वापर करावा. शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला तरच शेती वाचवता येईल. नाही तर शेतकरी आत्महत्या वाढतील.

**शेतकऱ्यांसाठी त्यांच्या शेतावर नरेगा राबवणे :–**

नरेगा (रोजगार हमी योजना) ही महाराष्ट्राचे देशासाठी नव्हे तर जगासाठी मोठे वरदान ठरले आहे. आज कोरोनामुळे उद्‌भवलेल्या आपत्तीमुळे एकीकडे नरेगाची कामे निघत नाहीत आणि दुसरीकडे शेतकरीही संकटात आला आहे. अशा वेळी कायद्याच्या चौकटीत राहून राज्य सरकारने मे महिन्यातील २० दिवसांसाठी एका शेतकरी कुटुंबातील चौघांसाठी त्यांच्याच शेतात कामासाठी नरेगातून कामास मंजुरी देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. आपल्याच शेतावरील काम असल्याने त्यात कुणी कामचुकारपणा करण्याची शक्यता नाही. त्यामुळे नरेगाची अंमलबजावणी होईल. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हातात पैसा जाईल आणि शेतीची सोय होईल.

**खताचे कारखाने सुरू करणे :–**

शेती करण्यासाठी बी–बियाणे, खते यांची गरज भासणार आहे. याकरिता शेतकऱ्यांना किफायतशीर दरात पुरेसे, चांगल्या गुणवत्तेचे बियाणे उपलब्ध व्हायला हवेत.

**शेतकऱ्यांचे गट तयार करावेत :–**

बी–बीयाणे आणि खताची नेमकी मागणी जाणून घेण्यासाठी एकसमान पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांचे गट तयार करावेत. त्यांची मागणी नोंदवू घ्यावी. यामुळे मागणी आणि पुरवठा यांचा ताळमेळ बसेल. काळाबाजार होणार नाही.

**हवामानाचा अचूक अंदाज :–**

हवामानाचा अचूक अंदाज घेऊन त्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील संस्थांची मदत घेऊन विभाग निहाय, पीक निहाय पेरण्यांच्या तारखा शेतकऱ्यांपर्यंत कळविणे गरजेचे आहे. कोरोनाच्या संकटाचा सामना करीत असतांना दुबार पेरणीच्या दुहेरी संकटात शेतकरी जाणार नाही. याची खबरदारी गरजेची आहे.

**नुकसान भरपाई :–**

द्राक्षे, पपई, केळी, आंबा, फुले या फळ उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे फळ उत्पादक शेतकऱ्यांचे नेमके व कोणते नुकसान झाले आहे. याचा अंदाज काढण्यासाठी तत्काळ सर्वेक्षण व भरपाई तसेच इतर उपाययोजना शक्य आहे.

**वीज पुरवठा :–**

उद्योग बंद असल्याने त्यासाठी लागणारी वीज तात्पुरत्या प्रमाणात शेतीकडे वळविण्याची ही चांगली संधी आहे. बारा–बारा तासांची दोन सत्रे असे नियोजन करून शेतीला वीजपुरवठा केल्यास शेतकरी त्यांच्या पाण्याचे वेळापत्रक ठरवू शकतो. उन्हाळ्यातील बागा, पिके वाचवू शकतो. त्यासाठी तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

**पिक विमा जमा करणे** :–

मे महिन्यात पूर्व मशागत तर जूनपासून पेरणीला सुरूवात होईल. बी–बीयाणे, खत, मजूर आणि इतर खर्चासाठी लवकरात लवकर पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.

**खरेदी – विक्री गतीमान करणे :–**

शेतकऱ्यांकडे साठवलेल्या मालाच्या विक्रीची यंत्रणा नाही. बाजार बंद आहेत. विक्री नसल्याने हातात पैसा नाही. अचानक बाजार उघडले तर दर पडतील पुन्हा शेतकऱ्यांचेच नुकसान होईल. यामुळे सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांमध्ये बसवून बाजार समित्यांत खरेदी विक्री सुरू करावी.

**सरसकट उपययोजना नको :–**

अन्य उत्पन्न असणाऱ्या व शेती हा ज्यांचा जोडधंदा आहे, त्यांना कोरोनामुळे काही अडचणी येत आहेत. त्यांनाच शेतकऱ्यांच्या समस्या समजून उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र ज्यांच्याकडे उत्पन्नाचे दुसरे साधन नाही, अशा शेतकऱ्यांची परिस्थिती कोरोनामुळे अधिक बिकट झाली आहे.

**अवजारांचा पुरवठा :–**

फक्त खते, बियाणेच नाही तर शेतीकामासाठी आवश्यक अवजारे, ट्रॅक्टर, डिझेल यांचा पुरवठाही लॉकडाऊनच्या काळात आणि त्यानंतरही सुरळीत ठेवणे हे देखील सरकारपुढील मोठे आव्हान आहे. ते पूर्ण झाले तरी शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरू शकतो.

**मानसिक धैर्य व आधार :–**

मजुरांची समस्या, बाजारपेठ आणि वाहतुकीच्या अडचणी यामुळे अनेक शेतकऱ्यांनी मळे, बागा अर्धवट सोडल्या तसे झाले तर येत्या काळात भाजीपाल्यांचा तुटवटा उद्‌भवून किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नैराश्याच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांस शासनाने दिलास देण्याची गरज आहे. त्याला मानसिक धैर्य व आधार देण्याची गरज आहे.

**निष्कर्ष व शिफारशी :–**

लॉकडाऊनमुळे शेतकरी आणि शेती उद्योग मोठ्या अडचणीत सापडला आहे. शेतकरी वर्षभराचे नियोजन करून पीक लागवड करत असतो. खरिपात झालेला अती पाऊस, मका, कापूस यासारख्या पिंकावर आलेले रोग यामुळे घटलेले उत्पादन आणि पडलेल्या बाजारभावामुळे खरिपात शेतकऱ्यांच्या हाताला काही फार लागले नाही. आता रब्बीतही कोरोनाचे संकट उभे राहिले आहे.

लॉकडाऊनमुळे आज शेतात मजूर कामाला येत नाही. त्यामुळे माल काढता येत नाही. काढला तर तो विक्रीसाठी बाजारात नेण्यासाठी वाहन नाही आणि नेलेच बाजारात तर तो माल विकला जाईल याची कोणती ही हमी नाही. यामुळे शेतकऱ्यांना हा माल आपल्या डोळयादेखत क्षेत्रात तसाच सोडून द्यावा लागत आहे. शेतकऱ्यांना या अडचणीच्या काळात कशी मदत करायची याचा विचार होणे गरजेचे आहे.

जे शेतकरी निसर्गनिर्मित, मानवनिर्मित संकटांना घाबरून आपल्या शेतमालाची नासधुस करतात, त्यांच्यासाठी त्याच शेतमालापासून लाखो रूपये कमवयाचे उपाय आहेत. कोरोनाच्या झटक्यानंतरचे शेतकरी कोणत्याही संकटाच्या बाबतीत अत्यंत सतर्क, हुशार व भावनांच्या आहारी न जाता शेती करणारे असतील. कोरोनाच्या धसक्याने जगभरातील ग्राहक रोग प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी विषमुक्तच अन्न खातील व त्यांना लागणारा शेती माल चांगल्या भावात विकण्याचे विविध व अनेक उपाय शेतकरी शोधतील. उदा. सोयाबीनवर प्रक्रिया करून तब्बल ५२ उत्पादने तयार करता येतात व गडगंज पैसा कमावता येतो हे शेतकऱ्यांना समजवून घ्यावे लागेल. बाजार समितीत ५० रू. किलोने खरेदी केली जाणारी तूर सेंद्रिय असल्यास तिची डाळ १२० ते १३० रू. किलो या भावाने ग्राहक खरेदी करतात. नारळाच्या करवटयांपासून ॲक्विव्हेटेड चारकोल तयार करून कोट्यवधी रूपयांची कमाई करता येते.

**संदर्भ सूची :–**

१. सामना वृत्तपत्र – २ मे २०२०
२. लोकमत वृत्तपत्र – १० मे २०२०
३. दिव्य मराठी वृत्तपत्र – १० मे २०२०
४. न्यूज प्रभात वृत्तपत्र – २३ मार्च २०२०
५. महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र – १२ मे २०२०
६. International Webinar on Impact of COVID-19 on Golbal Economy- 12 June 2020